९८

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

**प्रस्तावना**

**विषय:-** प्रारूप सुधारित विकास योजना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका जि. ठाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (३) अन्वये नियोजन समितीस मुदतवाढ देणेबाबत ...

**संदर्भ:-** सर्व नियोजन समिती सदस्य यांचा दि. १२/०९/२०२४ रोजीचा विनंती अर्ज.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६(१) मधील तरतूदीनुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीची प्रारुप विकास योजना तयार करुन त्यासंबधीची सूचना उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये दिनांक १२/१०/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

उपरोक्त सूचनेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती/सूचना धारकांना सुनावणी देण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये सूचना क्र.तांत्रिक/संसनर/वियोविघ/भिनिश मनपा/३६४, दि. २४/०१/२०२४ अन्वये गठीत झालेली आहे.

उक्त अधिनियमाचे कलम २८(३) अन्वये नियोजन समितीची नियोजन प्राधिकरणास प्राप्त हरकती/सूचनांवर सुनावणी देऊन अहवाल सादर करण्याची मूळ मुदत लोकसभा निवडणुक, २०२४ व महाराष्ट्र विधान परिषदेसाठी ०२ पदवीधर आणि ०२ शिक्षक मतदार संघाची निवडणुक आचारसंहीतेचा कालावधी वगळता दि. १२/०७/२०२४ पावेतो होती.

उक्त नियोजन समितीने प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेवर प्राप्त हरकत/ सुचनांची संख्या विचारात घेऊन त्यांचेकडील दि.१२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी २ महिन्याची मुदतवाढ पत्रात नमूद कारणास्तव मंजूर होण्यास विनंती केलेली त्यास मा. प्रशासकिय ठराव क्र.४५५ दि.१६/०७/२०२४ अन्वये दि. १३/०७/२०२४ ते दि. १२/०९/२०२४ पर्यंत मुदत वाढीस मंजुरी देऊन व भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा आदेश क्र.तांत्रिक/ससंनर/वियोविघ/भिनिश मनपा/२५२९९ /२०२४, दि. १६/०७/२०२४ अन्वये मुदतवाढ देण्यात आली आहे.

आता उक्त नियोजन समितीने, पत्रात नमूद कारणास्तव त्यांचेकडील दि. १२/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी दि. १३/०९/२०२४ ते दि.१२/१०/२०२४ पर्यंतची १ महिन्याची मुदतवाढ मंजूर होण्यास विनंती केलेली त्यास मा. प्रशासकिय ठराव क्र.५५५ दि.१३/०९/२०२४ अन्वये दि.१३/०९/२०२४ ते दि. ३०/०९/२०२४ पर्यंतच्या मुदतवाढीस मंजुरी देऊन व भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा आदेश क्र. जा.क्र.तांत्रिक /ससंनर/वियोविघ/भिनिशमनपा/२५२७६/२०२४, दि. १३/०९/२०२४ अन्वये मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र दि.२५/०९/२०२४ रोजी झालेल्या चर्चेनुसार नियोजन समिती सदस्यांनी पत्रात नमूद कारणास्तव त्यांचेकडील दि. १२/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपेक्षील्यानुसार दि. ३०/०९/२०२४ पासून पुढे अजुन काही दिवसांची मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे दिसुन आले आहे.

सद्या मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नाहीत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक या नात्याने आयुक्त, भि.नि.श.म.न.पा. पाहत आहेत. विषयांकित नमुद कलम २८ (३) अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ५८७ **दि.** २६/०९/२०२४

१) नियोजन समितीने पत्रात नमूद केलेली कारणमिमांसा व त्यावर विभागाकडुन प्रस्तावित करण्यात आल्यानुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रारुप सुधारित विकास योजना कार्यवाही

अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या नियोजन समितीला मुदतवाढ मंजुर करणे आवश्यक असल्याने उक्त नियोजन समितीला प्राप्त हरकती/सूचनांची सुनावणी घेऊन अहवाल सादर करण्यासाठी, कलम २८(३) अन्वये दि. ०१/१०/२०२४ ते दि. ०७/१०/२०२४ पर्यंतची मुदतवाढीस या ठरावाव्दारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने पुढिल प्रशासनिक कार्यवाही करण्यासाठी आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

का.प्रत

(अजय विलास वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी नि. श. महानगरपालिका,
भिवंडी.

25/9 25/9

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे कामाकरीता प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मि. इतके आहे. मनपा कार्यक्षेत्रामध्ये २०२७ बोअरवेल आहेत. बोअरवेल निगा व दुरुस्तीचे कामकाज वार्षिक ठेकापध्दतीने ठेकेदारा मार्फत करुन घेतले जाते.

मनपाच्या कार्यक्षेत्रात दररोज बोअरवेल नादुरुस्तीच्या तक्रारी येत असतात सदर तक्रारींचे निवारण वेळेच्या वेळी करावे लागते तसेच पदाधिकारी तसेच नागरीकांच्या प्रत्यक्ष व फोन वरुन दैनंदिन प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करावे लागते. सद्या मनपाच्या भंडारगृहात (उदा. हातपंप साठी लागणारे साहित्य जीआय युनिअन, जीआय पाईप, हॅन्ड पंप सिलेंडर, हॅन्ड पंप जीआय स्टॅन्ड, वॉटर टँक, जीआय हेड, गन मेटल अप्पर व्हॉल्व, गन मेटल लोवर व्हॉल्व, स्टेनलेस स्टील प्लंगर रॉड, रेड्युसर कॅप, गन मेटल प्लंगर लॉक बॉडी, व्हॉल्व रबर सिटींग, सिटींग रिंग, पंप बकेट, गन मेटल फ्लॉवर, गन मेटल चेक व्हॉल्व गाईड, गन मेटल चेक व्हॉल्व सेट, सिलेंडर बॉडी लाईनर, गॅलोनीस हॅन्डल बार, स्टेनलेस स्टील हॅन्डल बार, एसकेएफ बेअरिंग ६२०४ झेड, रोलर चैन, बॉडी नटबोल्ट, जीआय वॉशर एम-१२.४ एम.एम., रॉड कपलिंग, कनेक्टींग रॉड, कनेक्टींग रॉड १२ एम.एम., हेड फॉर इंडिया मार्क, बोअरिंग ग्रिस व सबमर्सिबल पंप साठी लागणारे साहित्य ३ कोर ४.० स्के.एम.एम. कॉपर केबल, पॅनेल बोर्ड १ ते ६ एचपी, पीव्हीसी आरमाऊर्ड केबल २ कोर ४ स्के. एम.एम. अॅल्युमेनिअम कंडेनकटर, सबमर्सिबल पंप सेट २३० व्हो ५० एचझेड एसी सप्लाय, मोटर २ एचपी थ्री फेज १४०० एरपीएम ऑल टाईप्स, एमडीपीई पाईप आयएसओ ४४२७:१९९६, जीआय कप्लींग निप्पल फ्री क्लास इत्यादी किरकोळ साहित्य) उपलब्ध नसल्यामुळे आवश्यकते नुसार नविन साहित्य मागविणे आवश्यक आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता कुपनलिका दुरुस्ती खर्च या लेखाशिर्षकांतर्गत मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणेकामी रु.२६,९७,२४७/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबत. | रु. २६,९७,२४७/- |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबतचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक : ५८८

दिनांक : २७/०९/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबत कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामी साहित्य पुरविणे बाबतच्या रु.२६,९७,६४७/- मात्रच्या प्रस्तावास मान्यता देऊन प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि. शहर महानगरपालिका,भिवंडी.

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

विषय :- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (Extd. MUIP) अंतर्गत खालील नमुद कामे एम.एम.आर.डी.ए. कार्यालयाकडे परिपुर्ण प्रस्तावासह मंजुरी करिता सादर करणे बाबत.

संदर्भ :- कार्यकारी अभियंता, एम.एम.आर.डी.ए. यांचे क्र.मु.म.प्र.वि.प्रा./अवि/वि.मुं.ना.प्रा.सु./भिवंडी तालुका/ /२०२४ दि. / /२०२४ रोजीचे पत्र.

कार्यकारी अभियंता, एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, मुंबई. यांचे उपरोक्त विषयांकीत संदर्भिय पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रान्वये मनपा हद्दीतील विविध रस्ते विकास कामांकरिता एम.एम.आर.डी.ए. निधी अंतर्गत ७.५५ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता संबंधीत कार्यालयाकडून देण्यांत आलेली आहे. प्रस्तावित कामे खालिल प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १३ मध्ये वज्रेश्वरी मंदिर,संपदाबाई चौक ते बाळु पाटील यांचे घरा पर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे | २,०९,८९,०८०/- |
| २ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १३ मध्ये संपदाबाई चौक ते मंगलमुर्ती कॉम्पेक्स पर्यंत रस्त्याच कॉंक्रिटीकरण करणे. | १,९४,९२,४५९/- |
| ३ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १३ मध्ये माऊली कंपा. ते विठठल रुखमीणी मंदिर पर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. | १,७४,६३,८९७/- |
| ४ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १३ मध्ये खंडेराव मंदिर ते विठठल रुखमीणी मंदिर पर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. | १,७४,९६,५४३/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | **७,५४,४१,९७९/-** |

सदर कामांचे प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त आधिकारी, मुख्य लेखापरिक्षक यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी वरिल नमुद कामांस दि. / /२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये सदर कार्यालयाचे नाहरकत प्राप्त करणेकामी कार्यकारी अभियंता, एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, मुंबई. यांचेकडे प्रस्ताव पाठविणेकामीचा प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव क्रं. : ५८९ दिनांक :-३०/०९/२०२४

कार्यकारी अभियंता, एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, मुंबई. यांचे क्र.मु.म.प्र.वि.प्रा./अवि/वि.मुं.ना.प्रा.सु./भिवंडी तालुका/ /२०२४ दि. / /२०२४ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने ७.३० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता संबंधीत कार्यालयाकडून देण्यांत आलेली आहे. सबब सदर पत्रातील खालील नमुद कामांना नाहरकत पत्र प्राप्त करणेकामी खालिल नमुद कामे मान्यतेसाठी संबंधीत कार्यालयाकडे प्रस्तावित करण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १३ मध्ये वज्रेश्वरी मंदिर,संपदाबाई चौक ते बाळु पाटील यांचे घरा पर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे | २,०९,८९,०८०/- |
| २ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १३ मध्ये संपदाबाई चौक ते मंगलमुर्ती कॉम्पेक्स पर्यंत रस्त्याच कॉंक्रिटीकरण करणे. | १,९४,९२,४५९/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १३ मध्ये माऊली कंपा. ते विठठल रुखमीणी मंदिर पर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. | १,७४,६३,८९७/- |
| ४ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र. १३ मध्ये खंडेराव मंदिर ते विठठल रुखमीणी मंदिर पर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. | १,७४,९६,५४३/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | **७,५४,४१,९७९/-** |

सदर प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे त्यास पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद कामांचे प्रस्ताव **कार्यकारी अभियंता, एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, मुंबई.** यांचेकडे नाहरकत पत्र प्राप्त करणेकामीचा प्रस्ताव सादर करणेकामी मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका